जगभर

# सौदी अरेबिया आणि व्हेनेझुएला

## चन्द्रशेखर पुरन्दरे

या लेखात वरील दोन देशांतील भिन्न पण दमनकारी धोरणांची उदाहरणे आहेत.

**सौदी अरेबिया**

सौदी अरेबियात कट्टर सुन्नी मुस्लिम हुकूमशाही आहे. एका घराण्याची सत्ता देशाच्या स्थापनेपासून म्हणजे गेली ऐंशी वर्षे आहे. सत्ताधाऱ्यांना कोणताही विरोध मान्य नसतो. विरोधकाला तुरुंगवास नक्की, प्रसंगी मृत्युदंडही दिला जातो. अशा शिक्षा आजवर बहुश: देशान्तर्गत दिल्या जात. त्याविरुद्ध जागतिक मानवी हक्क संघटना व अधूनमधून पाश्चिमात्य देश औपचारिक निषेध व्यक्त करत आलेले आहेत. त्याची राजवटीला फिकीर नाही. कारण सौदी अरेबिया जगाचे तेलाचे भाव नियंत्रित करतो आणि पश्चिमेच्या शस्त्रास्त्रांचा तो एक प्रमुख ग्राहक आहे. अर्थकारण आणि नीतीमत्ता राजकारणात विभक्त असतात. त्यामुळे पश्चिमेचा आवाज निष्प्रभ ठरतो.

ट्रम्प अध्यक्ष होईपर्यंत अमेरिकेचे सौदी धोरण जपून असे. त्या देशाला दुखवायचे नाही पण फार जवळीकही दाखवायची नाही. आता ट्रम्पने सौदीला मध्य-पूर्वेतील सगळ्यात महत्त्वाचा मुस्लिम देश मानलेला आहे. त्याची दोन प्रमुख कारणे - एक म्हणजे इराण-द्वेष. इराण कट्टर शिया मुस्लिम देश. मध्य-पूर्वेवर वर्चस्वासाठी या दोन देशांत चुरस आहे. दुसरे कारण म्हणजे अमेरिकन शस्त्रांची सौदीला निर्यात. सौदी या शस्त्रांचा वापर येमेन या गरीब व दुबळ्या देशावर बेगुमानपणे हल्ले करण्यासाठी करतो, हे सर्वश्रुत आहे. त्या हत्याकांडात प्रत्यक्ष बळी, टंचाईने भूकबळी कित्येक हजारात तर देशोधडीला लागलेले येमेनी लाखांत आहेत. या शस्त्र-निर्यातीला अमेरिकेत अंतर्गतही विरोध आहे.

जून २०१७ला सौदी राजवटीत प्रचंड उलथापालथ झाली. राजा सलमान याने मुहम्मद बिन सलमान या ३३ वर्षाच्या राजपुत्राला अधिकृत उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. त्याने सूत्रे हातात घेताच नोव्हेंबरमध्ये राजवटीची दहशत वाढवली. आपल्या वैयक्तिक सत्तेला संभाव्य आव्हान येऊ नये यासाठी इतर राजपुत्रांवर भ्रष्टाचारविरोधी कारवाई केली. 'इराणला शह' या सांगण्याच्या कारणाने येमेनवरील कारवाई तीव्र आणि अधिक हिंसक केली आहे. ट्रम्पचा जावई व बिन सलमान यांची वैयक्तिक दोस्ती आहे. जावई ट्रम्पचा मध्य-पूर्वेचा अधिकृत सल्लागार.

या पार्श्वभूमीवर जमाल खाशोगी नावाच्या पत्रकाराची हत्या झाली. खाशोगी अगदी अलिकडेपर्यंत सौदी राजघराण्याचा निकटवर्ती होता. सौदीत व मध्य-पूर्वेत निर्वाचित लोकशाही असावी हा त्याचा आग्रह होता. लोकशाही आली की अनिर्बंधित घराणेशाहीला आळा बसेल. विरोधकांशी संवादामुळे, त्यांच्या सत्ता-सहभागामुळे देशांतर्गत व मध्य-पूर्वेतील इतर देशांतील चालू वैरे, युद्धेही कमी होतील अशी त्याची भूमिका. हा आग्रह बिन सलमानला खुपत होता. मध्य-पूर्वेतील हुकूमशहांच्या किंवा लष्करशहांच्या, तेथील धर्म-मार्तंडाच्या व अतिरेकी गटांच्या मते लोकशाही ही इस्लाम-विरोधी कल्पना आहे. कारण ती मुस्लिम धर्मश्रद्धांच्या विरोधात जाते. हीच भूमिका मध्य-पूर्वेबाहेरील बहुतेक संपन्न लोकशाही राष्ट्रांची व जनतेची आहे. 'अरब लोकशाही हाताळू शकणार नाहीत' असा हा दावा असतो. पण २०११ पासून ट्युनिशिया ते इजिप्तपर्यंत 'अरब वसंता'ने तो दावा खोटा ठरवला. लोक त्या मागणीसाठी उत्स्फूर्तपणे लाखोंनी रस्त्यावर आले होते. म्हणजे सामान्य अरबाला लोकशाही हवी आहे असे खाशोगीचे प्रतिपादन होते.

जूनच्या सत्तांतरणानंतर खाशोगी बिन सलमानच्या राजवटीला अमान्य झाला. त्याच्या लिखाणावर बंदी घालण्यात आली, नातेवाईकांचे छळ सुरू झाले. मग खाशोगी यापुढे आपल्याला सौदी अरेबियात रहाणे अशक्य आहे अशा निर्णयाला

आला. तो अमेरिकेला गेला व वॉशिंग्टन पोस्ट या प्रतिष्ठित अमेरिकन वृत्तपत्रात लिहू लागला. त्याची राजवटीवरची टीका बिन सलमानला पचनी पडेना.

खाशोगीला एका बहाण्याने तुर्कस्तानमधील सौदी वकिलातीत मुलाखतीसाठी दोन ऑक्टोबरला बोलावण्यात आले. त्याप्रमाणे तो तेथे गेला आणि जिवंत बाहेर आला नाही.

बिन सलमानने सौदी अरेबियाहून १५ खास मारेकरी पाठवून त्याची वकिलातीत तो आल्या आल्या हत्या करवली हे काही आठवड्यात स्पष्ट झाले. मृतदेहाचे करवतीने कापून तुकडे केले गेले आणि ते रसायनात विरघळवण्यात आले.

तुर्कस्तानच्या अध्यक्षाने, अमेरिकन व पाश्चात्त्य प्रसार माध्यमांनी, मानवी हक्क संघटनांनी व अगदी संयुक्त राष्ट्रसंघानेही हा प्रश्न लावून धरला म्हणून हा खून उघडकीला तरी आला. तरी ट्रम्प बिन सलमानला दोषी मानायला तयार नाही. एका पत्रकाराच्या जीवाची किंमत विरुद्ध अब्जावधी डॉलर्सचा शस्त्र-पुरवठा असे ट्रम्प-सौदी यांचे गणित आहे.

*(हा लेख लिहिण्याच्या वेळी बिन सलमान पाकिस्तान-भारत-चीन दौऱ्यावर आहे. पुलवामा हत्याकांडानंतरचा पाकिस्तान-भारत तणाव आपण कमी करू असा त्याचा दावा आहे!!)*

**व्हेनेझुएला**

व्हेनेझुएला हा देश दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर सीमेवर आहे. जगातील सर्वात जास्त तेल त्या देशात आहे. त्या खालोखाल सौदी अरेबिया. जागतिक अभ्यासात असे आढळून आले आहे की तेलावर जवळजवळ सगळी अर्थव्यवस्था अवलंबून असणारे देश एकतंत्री राजवटीकडे झुकतात. मध्यपूर्वेतील तेल-संपन्न देश, नायजेरिया, इंडोनेशिया, मेक्सिको, रशिया आणि व्हेनेझुएला ही प्रमुख उदाहरणे.

तेलाच्या निर्यातीने चलन बळकट होते आणि आयात स्वस्त होते. मग शेती व उत्पादक उद्योग दुर्लक्षिले जातात. लोक त्या व्यवसायांतून तेलाशी संबंधित उद्योगांकडे वळतात. सरकार निर्यातीच्या उत्पन्नावर चालते, अंतर्गत करांवर नाही. त्यामुळे समाज व इतर उद्योग यांचे सरकारशी संबंध तुटक रहातात. तेल कंपन्या व सरकार यांचे साटेलोटे रहाते. या मूठभर लोकांकडे देशाची संपत्ती एकवटलेली असते. देशात स्वतंत्र संस्था - नोकरशाही, न्यायसंस्था दुबळ्या रहातात किंवा हेतुपुरस्सर त्या दुबळ्या ठेवल्या जातात. जोपर्यंत तेलाला आंतरराष्ट्रीय बाजारात जास्त भाव मिळतो, तोपर्यंत ही मूठभर मंडळी देशाकडे तो सगळा पैसा जमा करण्यापेक्षा स्वत:ची धन करतात. म्हणजे भ्रष्टाचार अतोनात वाढतो.पण तेलाचे भाव गडगडले की अर्थव्यवस्था अचानक धोक्यात येते.

व्हेनेझुएलात हे सगळे प्रकार घडलेले आहेत. नावाला लोकशाही असली तरी व्हेनेझुएलाची आजवरची वाटचाल याच दिशेला झालेली आहे. विशेषत: २०१० पासून अर्थव्यवस्था डळमळीत व्हायला सुरुवात झाली. देशात आज अराजक आहे.

निकोलस मदुरो हा विद्यमान अध्यक्ष. त्याच्या आधीचा अध्यक्ष ह्यूगो शावेझ. त्याच्या काळात देशातील गरीबी कमी झाली, सामाजिक सुरक्षा वाढली पण त्याचबरोबर त्याने देशाच्या संस्था खिळखिळ्या करायला सुरुवात केली. प्रसारमाध्यमांवर नियंत्रणे आणली, न्यायसंस्थेत 'आपले लोक' भरले. त्याच्यानंतर निकोलस मदुरो अध्यक्ष झाला. त्याने हे धोरण चालू ठेवले.

२०१४ला तेलाचा भाव आंतरराष्ट्रीय बाजारात १०० डॉलर्स प्रति बॅरल होता. तो २०१६ला ३० डॉलर्सवर आला. परिणामत: आता व्हेनेझुएलात अर्थव्यवस्था 'व्यवस्था' अशी राहिलेली नाही. चलन कोसळले आहे, अन्नाची, औषधांची टंचाई वाढली आहे. त्यामुळे उपासमारही. लोक देश सोडून जात आहेत. आजमितीला लोकसंख्येच्या एक-दशांश लोक देश सोडून गेले आहेत. देशाला स्थैर्य देणाऱ्या संस्थाच अक्षम असल्याने मदुरोचा भरोसा लष्कर आणि पोलीस यांच्यावर आहे. आजवर रस्त्यावरच्या निदर्शकांत शंभरहून अधिक बळी पडले आहेत.

दरम्यान जुआं गिदो या विरोधी नेत्याने मदुरो नाही तर मीच अध्यक्ष आहे असा दावा केला आहे. त्याला अमेरिका, द. अमेरिका खंडातील मोठे देश व युरोपमधील बऱ्याच राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. पण रशिया, तुर्कस्तान, क्युबा, बोलिव्हिया अजून मदुरोला पाठिंबा देत आहेत.

अमेरिका लष्करी हस्तक्षेप करण्याची धूसर शक्यताही आहे. एकूण सामान्य माणसाच्या हाल-अपेष्टांना अंत दिसत नाही.

www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk